पुण्यनगरी

संमिश्र ■ रविवार, ८ नोव्हेंबर २००९

# लेजची सर्वात मोठी ग्राहक संपर्क योजना

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) - नमकीन स्नॅक्स उत्पादनातील भारताचा अग्रणी ब्रॅण्ड लेजने ग्राहकांची सर्वाधिक पसंतीची चव जाणून घेण्याच्या दृष्टिकोनातून ग्राहक संपर्क योजना सुरू केली आहे. देशभरातील ग्राहकांचा समावेश करून घेऊन त्यांच्या आवडी निवडी जाणून सर्वाधिक ग्राहकांची पसंती मिळविणारी नवीन चव शोधण्यासाठी फ्रिटोलेने हा नवीन अनोखा उपक्रम हाती घेतला आहे.

या आगळ्यावेगळ्या स्पर्धेत सेलिब्रिटी शेफ आदित्य बाल, जेडब्ल्यूटीच्या उपाध्यक्ष आणि कार्यकारी सृजनशील संचालिका तसेच लेखिका अनुजा चौहान आणि पेप्सिको इंडियाच्या संशोधन व निर्मिती विभागाचे संचालक डॉ. टी. एस. आर. मुरली यांचे तज्ज्ञ मंडळ परीक्षकांचे काम करणार आहे. दरम्यान, या मोहिमेतील विजेच्या ग्राहकास रु. ५० लाखांचे बक्षीस तसेच स्वादासह तयार केलेल्या लेजच्या उत्पन्नातील १ टक्का भागही दिला जाणार आहे.